# प्रेसनोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १५/०७/२०२६

दिनांक ०३/०७/२०२६ रोजी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, ते बांधकाम कंत्राटदार असुन त्यांनी आसलगाव ग्राम पंचायत, पंचायत समिती जळगाव जामोद, अंतर्गत २ नाली बांधकाम, व १ पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे अशा सन २०२५—२०२६ या कालावधीत केलेल्या तिन्ही कामांच्या बिलाचे देयकाची रक्कम मंजुर करून दिल्याचा मोबदला म्हणुन आरोपी लोकसेवक श्री.संदिप उत्तमराव मोरे वय ५२ वर्ष ,पद—विस्तार अधिकारी पंचायत ,पंचायत समिती कार्यालय जळगांव जामोद यांनी बिलाच्या रकमेच्या ३ टक्के प्रमाणे २५०००/— रू ची लाच रकमेची मागणी केली आहे परंतु त्यांना लाच देण्याची तक्रारदार यांची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी बाबत तक्रार दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी आज दि.१५/०७/२०२६ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे श्री.संदिप उत्तमराव मोरे यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष आसलगाव ग्राम पंचायत, पंचायत समिती जळगाव जामोद, अंतर्गत २ नाली बांधकाम, व १ पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे अशा ०३ कामांच्या बिलाचे देयकाची रक्कम मंजुर करून दिल्याचा मोबदला म्हणुन बिलाच्या एकुण रकमेच्या ३ टक्के प्रमाणे लाचेची मागणी केल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले.

सापळा कार्यवाहीदरम्यान तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष आलोसे श्री.संदिप उत्तमराव मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम ३ टक्के प्रमाणे २५०००/— रूपये त्यांचे खाजगी वाहनामध्ये ठेवण्यास सांगुन तक्रारदार यांचेकडुन स्वत:करीता लाच स्विकारली.आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेवर पोलीस स्टेशन जळगांव जामोद जि.बुलढाणा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी श्री.राजेश राठोड, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक रविंद्र सहारे, पोलीस निरीक्षक स्वप्नील निराळे, पोलीस अंमलदार अभय वाघ, वैभव जायले,मोहन ठाणेकर,चालक अंमलदार श्री.राजेश बहीरट यांनी पार पाडली.

अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयातील सर्व नागरीकास आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांचे वतीने खाजगी इसम यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्का व्यतिरीक्त लाचेची मागणी केली असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे संपर्क साधावा. तक्रारदाराचे तक्रारीवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

१) मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र
मो.क्र.९०११३२३४२६

२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र
मो.क्र.९७६४२१०४८५

३) श्री.राजेश राठोड, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती
मो.क्र.९८२३६२२२९५, ७५१७५७१०६४

४) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१—२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर—१०६४

रविंद्र गु.सहारे
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती

Scanned with OKEN Scanner